# UNIVERSITY GRANTS COMMISSION

**Westerm Regional Office (WRO) Pune**




**Prof. A.M.Wankhade**

**Head Dept. of Co-op (Commerce)**
**S.S.S.K.R. Innani Mahavidyalaya,**
**Karanja (Lad) Dist. Washim (M.S.)**

**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**
**2010 - 2012**

**संशोधनाची उद्दीष्टये :-**

उदिष्ट म्हणजे काय ? :-

सामाजिक संशोधन हे एक शास्त्रीय योजना असून जिचा उद्देश तार्किक व क्रम पध्दतीद्वारा नवीन तथ्याचा शोध घेणे असून जून्या तथ्याचे पुर्नपरिक्षण व त्यांच्यात आढळून येणारे कार्यकारणभाव आणि त्यांना संचालित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे होय.

श्रीमती पालिन यंग यांच्या मते

सामाजिक संशोधनाची उदिष्टये :-

सामाजिक संशोधनाचे उदिष्टये पुढीलप्रमाणे आहे.

१. **अज्ञान नष्ट करणे :-** सामाजिक संशोधनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावला सामाजिक घटक आणि सामाजिक तथ्ये यासंबंधी सखोल ज्ञान प्राप्त होते. तसेच विविध घटकांतील कार्यकारण संबंध स्पष्ट होतो.

२. **सामाजिक जीवनाचा शास्त्रीय अभ्यास :-** या संशोधनद्वारे जीवनाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करता येतो. समाजातील तथ्ये लक्षात येतात. समाजातील बदलाची प्रक्रिया समजते. रचनेचे आकलन होते. सामाजिक संशोधन हा मानवी वर्तूणूकीचा अभ्यास आहे.

३. **मानवतेचे कल्याण :-**

संशोधनाचा उददेश केवळ अभ्यास करणे हा नसून त्याद्वारे मानवतेचे कल्याण साधावयाचे असते. मानवाला भौतिकदृष्ट्या सुरक्षितता प्रदान करावयाची असते. त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ करुन त्याला जास्तीत जास्त समाधान कसे मिळेल यासाठी प्रयत्न केला जातो.

४. **तथ्यांचे वर्गीकरण :-** संशोधनामुळे तथ्यांचे वर्गीकरण केले जाते तसेच तथ्यांमध्ये असणारा सहसंबंध स्पष्ट केला जातो. त्यामुळे सामाजिक जीवनातील विविध संकल्पनांची श्रृंखला लक्षात येते आणि जुन्या संकल्पनेचे परीक्षण करता येते.

५. **सामाजिक नियंत्रण आणि अनुमान :-**

सामाजिक संशोधनात सामाजिक घटकांचा अभ्यास केला जातो. मानवी जीवनावर प्रभाव पाडाणाऱ्या विविध घटकांचे आणि घटनांचे विश्लेषण केले जाते. विशिष्ट परिस्थितीत मानवाच्या वर्तणूकीचे अनुमान केले जाते. संशोधनद्वारे सामाजिक मूल्ये, श्रध्दा, प्रथा, अंधश्रध्दा आणि व्यवहार यांचा अभ्यास केला जातो. त्यात संपूर्ण मानवी जीवनाचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास केला जातो.

६. **कार्यकारण संबंधाचा शोध :-**

मानवी वर्तणूक आणि त्यांच्या क्रिया प्रतिक्रिया हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे. मानवी वर्तणूकीमध्ये कार्यकारण संबंध असतो. तो शोधून काढून आधारे सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न समाजशास्त्रीय संशोधनात केला जातो.

## संशोधनाची उद्‌दीष्टे

### पळसखेड येथील संशोधकाने घेतलेल्या विषयाच्या संशोधनाची उदिदष्टे

शेतकक-यांच्या अज्ञानामुळे त्यांना सावकार तसेच सरकारी अधिकारी यांनी त्यांचे अशिक्षित अडाणी पणाचा फायदा येऊन त्यॉंचे शोषण करण्यात सुरुवात केली. शेतक-यांच्या अडाणीपणाचा तसेच गरीबी, अशिक्षित पणा हया सर्व कारणाने शेतकरी वर्ग हा सावकाराचा प्रतिकार करु शकत नव्हते शेतकरी हा मुळताच अशिक्षित अडाणी वर्ग असून तो बहुतांश ग्रामीण भागातच राहतो. हया भागात म्हणजे ग्रामीण भागात हे शेतकरी जास्त प्रमाणात राहत असल्याने त्यांना सेवा सहकारी संस्थेतर्फे कसे संघटीत करण्यात यावे व त्याच्या हितासाठी हया संस्थेतर्फे कोणत्या प्रकारचे सहकार्य करण्यात आले व या संस्थेमध्ये सर्व शेतकयांना योजनाचा लाभ मिळत नाही. तर जे शेतकरी संस्थेचे सभासद असतात त्यांनाच हया (से.स.सो.) चा लाभ मिळतो. (बहुतेक सर्वच शेतकरी हया संस्थेचे सभासद होतात.) त्यांना कर्जपूरवठा केला जातो. कर्ज पुरवठा कशा प्रकारे केला जातो. कोणाला कर्ज दिले जाते किती दिले जाते यांचा लाभ खरोखरच शेतकरी घेतात कि नाही. खरोखरच हया संस्थेमुळे शेतक-यांचा विकासांना चालना मिळत आहे. काय? हे प्रश्न निर्माण होतात व याचाच अभ्यास मला करावयाचा आहे. याचे अध्ययन करण्याची उदिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

१. पळसखेड सेवा सहकारी संस्थेच्या शेतकरी सभासद आणि संस्थेचा कर्ज पुरवठा व इतर कार्याचा अभ्यास करणे.

२. संस्थेच्या सभासदांना (शेतक-यांना) संस्थेमार्फत होणाऱ्या कर्ज पुरवठा. (संस्थेमार्फत ) याचा अभ्यास करणे.

३. सहकारी संस्थेच्या सभासद शेतक-यासाठी संस्थेच्या इतर कार्याचा अभ्यास करणे (उदा. धान्य पुरवठा)

४. विविध कर्जाचा व इतर सेवांचा पुरवठा सभासदाना योग्य वेळी होतो किंवा नाही.

५. संस्थेच्या सभासद संख्येत वाढ की घट.

६. सभासदांची कर्जाची मागणी प्रमाणे कर्ज पुरवठा होते किंवा नाही.

७. सभासदांची कर्ज मागणी किती ?

८. संस्थेची सभासद जागृत आहेत का?

९. संस्था कर्जपुरवठा करतांना तारणावर कर्ज पुरवठा करतो काय?

१०. विहिर, पंप, शेती, अवजारे ईत्यादी वस्तु खरेदी करीता संस्था कर्ज पुरवठा करतो का?

११. अल्पमुदतीत पीक कर्ज आवश्यकतेवढे सभासदांना मिळते काय?

१२. सभासंदाना दर हेक्टरी कर्ज किती देते. तसेच ओलीत आणि कोरडवाहू करीता वेगळे वेगळे कर्ज दिले जातात काय?

१३. संस्थेच्या कार्यपध्दतीत काही दोष आहे काय? असल्यास त्या शोधून काढणे.

१४. संस्थेच्या समस्या कोणत्या आहेत त्याचा शोध घेऊन उपाय सुचविणे.

१५. कर्जधारक शेतकऱ्यांना सभासदाच्या समस्या दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

१६. सभासदांना केलेल्या कर्ज पुरवठयामुळे शेती उत्पादनात वाढ होते काय?

तसेच संस्थेतील लोकांची बचत व गुंतवणूक यांचा शोध घेऊन संघटन व्यवस्थापन कार्यक्षम आहे किंवा नाही तसेच संस्थेच्या उत्पन्नात वाढ आहे काय संस्थेवर ठराविक लोकांची पकड आहे काय असल्यास त्याच्या कारणाचा शोध घेणे, तसेच दुर्लक्ष घटक, अल्प भुधारक शेतकरी, सामान्य शेतकरी, शेतमजुर यांचा संस्थेत सहभाग आहे काय, सर्व व्यक्तींना हया संस्थेचा फायदा मिळतो काय किंवा सभासद व्यक्तीच हया संस्थेचा लाभ येऊ शकते ? हे सर्व प्रश्न निर्माण होतात हया सर्व अनुशंगाने मी हा विषय निवडून लघु शोध प्रबंध करण्याचे ठरविले व लघु शोध प्रबंध सुरुवात केली तेव्हा मला अनेक गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव आले.

वरील सर्व संशोधन होण्याचा उद्देशा करीता मी हा विषय निवडला आहे.

**निष्कर्ष :-**

शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढीकरीता सेवा सहकारी संस्था मर्यादित पळसखेड (र.जि.-४४०) चे योगदान एक अभ्यास

या विषयाचे अध्ययन केल्यावर काही महत्वाच्या गोष्टी निर्दशनात आल्या. त्याच प्रमाणे या संस्थेच्या कारभाराचे व कार्यप्रणालीचा अभ्यास २००५-२०१० या कार्यकारात करतांना मी खालील निष्कर्षापर्यंत येऊन पोहचलो या संस्थेचा अंतर्गत विकास पाहीजे तसा झाला नाही. संस्थेला तर अंतर्गत विकासाची आवश्यकता आहे. संस्थेच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना कर्जपुरवठा झाल्याने त्याची सावकाराच्या फाशातुन सुटका झालेली दिसून येते. पुर्वी गावातील सावकारच संपुर्ण कर्ज पुरवठा करीत होते. परंतु आता या संस्थेच्या माध्यमातुन कर्ज पुरवठा होतआहे. तरी सहकारी संस्थेच्या अनिश्चित धोरणामुळे शेतकऱ्याला सावकाराकडे धाव घ्यावी लागते. ते प्रमाण फारच नगण्य आहे. असे दिसून आले.

सेवा सहकारी संस्थेच्या सभासदाकडील कर्जाची थक्क बाकी दिवसांदिवस वाढत आहे. व वसुलीचे प्रमाण कमी होत आहे. २००५-२००६ पासुन वसुली चे प्रमाणाचा विचार केल्यास २००९-२०१० पर्यंत वसुलीचे प्रमाण एकदम कमी म्हणजे १०% आहे.

२००५-२०१० या पाच वर्षाच्या काळात संस्थेची तसेच सभासदांची आर्थिक प्रगती व अधिक कर्ज पुरवठा होण्याच्या दृष्टीने वसुली च्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक आहे म्हणुन सभासदांनी त्यांच्याकडील कर्ज थकीत न ठेवता ज्या प्रमाणात कर्ज भरणा करावयाचा असेल. त्या प्रमाणात कर्ज भरणा करावा जेणेकरुन कर्ज वसुलीचे प्रमाण वाढू शकेल. आणि त्या मुळे सर्वांना कर्ज पुरवठा होईल म्हणजेच संस्थेचा कर्ज पुरवठा व सभासदांचा कर्ज भरणा हे या संस्थेमधील केंद्रबिंदू असुन याची सांगड घालणे महत्वाचे आहे. हे कार्य सर्वांनीच करायचे होते (सर्वानी म्हणजे सभासद, सहकारी संस्था, संचालक मंडळ शासन इत्यादी) मी या संस्थेचा अभ्यास केल्यावर काही महत्वाच्या गोष्टी निर्देशनास आल्या आहेत.

१. संस्थेच्या सभासदाच्या संख्येत वाढ झाली आहे (पण फार गतीने)

२. सभासदांच्या शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ होत आहे पण याचे कारण फक्त सहकारी संस्थेचा कर्जपुरवठा आहे ऐवढेच नाही तर आधुनिक पध्दतीने शेती कसणे हे सुध्दा आहे. संस्थेने कर्जपुरवठा करुन परंपरागत पध्दतीने शेती कसली तर उत्पादनात वाढ झालेली नाही असे दिसून आले

३. कर्ज वसुलीचे प्रमाण कमी असल्याने संस्थेचे व्यवसाय बंद पडण्याच्या अवस्थेत आहे व खर्चाचे प्रमाण वाढल्याने ही संस्था आपला आर्थिक विकास करण्यास असमर्थ आहे.

४. असे असले तरी शेतकऱ्यांनी या संस्थांनी आपले अविभाज्य अंग समजुन या संस्थेची पुर्णबांधणी व विकासासाठी शासनाने व राजकीय पुढाऱ्याने पुढाकार घेणे आवश्यक आहे. तसेच शेतकरी वर्गानी सुध्दा संस्थेतील सर्व व्यवहाराबाबत सहभाग वाढवल्यास संस्थेचे व्यवहार वाढेल आणि त्याचा फायदा सहकारी संस्थेला व सभासद शेतकऱ्यांना होईल.

५. शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ झाली आहे पण त्यांची आर्थिक परिस्थिती हालाकीची आहे याचे कारण वेगवेगळे आहे जसे उत्पादन खर्च जास्त दुष्काळ, अवर्षण, इत्यादी.

६. कर्ज वाटप दोष पुर्ण (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातुन ज्या पध्दतीदवारे कर्ज वाटप संस्थेच्या माध्यमातुन केल्या जाते तो पुरेसा नाही ~~अडचणी~~ किंवा दोष आहे ज्याचा परिणाम संस्थेच्या उद्देषावर होतो. ब-हाच शेतकऱ्यांना पत पुरवठा धोरणाबाबत माहिती नसते कर्ज मंजुरी साठी बऱ्याच अटींची पुर्तता करावी लागते त्याचा परिणाम शेतकऱ्यावर होऊन ते कर्ज प्राप्तीसाठी योग्य प्रयत्न करीत नाही.

७ सहकारी क्षेत्रातील सेवा सहकारी संस्थांना विविध योजनाद्वारे प्रोत्साहन आणि मदत देण्याचे धोरण शासनाने मान्य केले आहे या दृष्टीने शासनाने सहकारी संस्थेतील सभासदांना आर्थिक सहाय्य करण्याचा उददेश आहे त्यासाठी संस्थेतील सभासदांना अल्प दरात व्याज पुरवठा जीवनापयोगी वस्तु रासायनिक खते, बी बियाणेचा पुरवठा इत्यादी सोयी एकाच संस्थेच्या माध्यमातुन उपलब्ध करुन दिल्या गाते त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणाल्या चालना मिळाली आहे यात शंका नाही

८. पळसखेड सेवा सहकारी संस्थेला शेतकऱ्यांकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्या मुळे व संस्थेचे उत्पादनापेक्षा खर्चाचे प्रमाण वाढल्यामुळे तसेच सभासदांनी कर्ज थकीत ठेवल्यामुळे संस्था आर्थिक दृष्टया डबघाईत येत आहे या क्षेत्रातील राजकीय पुढारी संचालक मंडळ तसेच सभासंदाचे सहकार्य, प्रेम व निष्ठा या संस्थेला लाभल्यास निश्चितच ही संस्था एक आदर्श म्हणुन नाव कमाविल यात शंका नाही.

एंकदरीत या संस्थेच्या मागील ५ वर्षाचा तुलनात्मक अध्ययावरुन असे दिसून येते की या संस्थेने केलेले शेतकऱ्याकरिता कार्य समाधान कारक आहे. आणि शेतीच्या शेती उत्पादनात वाढीकरिता आणि आर्थिक प्रगतीकरिता आपली भुमिका समाधानकारक बजावत आहे यात सुधारणा झाल्यास निश्चितच उच्च शिखरावर जाण्याची शक्यता टाळता येत नाही.